# University of Mumbai

परीक्षा विभाग,
महात्मा जोतीराव फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई–४०००९८

क्र.परीक्षा/विज्ञान/२८७ /२०१४. दि. २८ ऑगष्ट, २०१४.

परिपत्रक :–

मुंबई विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांचे संचालक/प्रमुख, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाते, दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक–नि–संचालक, तसेच विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, या कार्यालयाचे परिपत्रक क्र. परीक्षा/निकाल/२४०/२०१४,दि.३०जून,२०१४ अन्वये ज्या अभ्यासक्रमांचे परीक्षा आवेदन पत्र Online स्विकारण्याबाबत कळविण्यात आले होते; त्याबाबत असे नमुद करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांना **(उदा. T.Y.Bsc, Com. Sci, Biotech, Microbiology या अभ्यासक्रमासाठी प्रविष्ठ झालेले तसेच अन्य विद्यापीठातुन प्रथम व द्वितीय वर्ष पूर्ण करून या विद्यापीठात द्वितीय/तृतिय वर्षासाठी प्रविष्ठ झालेले व इतर बोर्डाकडून येऊन प्रविष्ठ झालेले विद्यार्थी)** PRN प्राप्त नाहीत पण त्यांची नावनोंदणी व पात्रता विद्यापीठाच्या Enrollment व Eligibility विभागाने Confirm (Manually) करून त्याबाबतचे पत्र दिलेले आहे. अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश महाविद्यालयांनी त्यांच्या Login मधून थेट तृतिय वर्ष सत्र–५ मध्ये करावेत व या विद्यार्थ्यांचा Eligibility Status Report व विद्यापीठाच्या Enrollment व Eligibility विभागाकडून Eligibility Confirmation झाल्याचे पत्र व याद्या त्वरीत परीक्षा विभागात त्या त्या निकाल कक्षाकडे (कला, वाणिज्य व विज्ञान) जमा करावेत. जेणेकरून संबंधीत विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र Digital University Portal वर उपलब्ध करून देता येईल.

तसेच पुन्हा संबंधीतांना असेही कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांचे Eligibility Confirm झाल्याबाबतचे पत्र प्राप्त होणार नाहीत अशा विद्यार्थ्यांचे Digital University Portal वर परीक्षा आवेदन पत्र भरता येणार नाहीत पर्यायाने त्याला Hall Tickets generate होणार नाहीत.

तरी वरील सर्व बाबींची संबंधितांनी नोंद घ्यावी ही विनंती.

(दिनेश भोंडे)
परीक्षा नियंत्रक

मुंबई–४०००९८.
२८ ऑगष्ट, २०१४.